क्रमांक **माध्य/ब/प्रखामा/** ५३/२०१९
कार्यालय, शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग नागपूर
**दिनांक :-** - 3 JAN 2020

**प्रति,**
**अध्यक्ष/सचिव**
**गोंदिया होमियोपॅथिक एज्युकेशन सोसायटी,**
**गोंदिया, जि. भंडारा**

**विषय :- प्रथम खाते मान्यता मिळण्याबाबत.**
**लिटिल वुडस इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया, जि. गोंदिया.**
(दर्जावाढ, इंग्रजी - माध्यम, - स्वयंअर्थसहाय्यित),

**संदर्भ :-** १) शासन पत्र क्रमांक एसएफएस- १०१९/प्र.क्र.७५२/एसएम-२ दिनांक २७/०८/२०१९
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य/ब/स्वअर्थ/८९३९/२०१९ दिनांक १०/१०/२०१९
३) शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, गोंदिया यांचे पत्र क्रमांक जिपगों/शिविमा/डे-८/ ३०४३/२०१९ दिनांक १३.११.२०१९

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना/विनयिमन) अधिनियम २०१२ अंतर्गत गोंदिया होमियोपॅथिक एज्युकेशन सोसायटी, गोंदिया, जि. भंडारा द्वारा संचालीत **लिटिल वुडस इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया, जि. गोंदिया** (स्वंयअर्थसहाय्यित) या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस (दर्जावाढ उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक इ.९ वी ते १२ वी) शासन निर्णय क्रमांक एसएफएस- १०१९/प्र.क्र.७५२/एसएम-२ दिनांक २७/०८/२०१९ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून म्हणून परवानगी दिलेली आहे. त्यानूसार सदरची परवानगी या कार्यालयाचे पत्र क्रमांक माध्य/ब/स्वअर्थ/८९३९/२०१९ दिनांक १०/१०/२०१९अन्वये संस्थेस कळविलेली आहे.

शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद गोंदिया यांनी त्यांचे संदर्भिय क्र. ३ चे पत्रान्वये शिफारसीसह शाळेला खात्याची प्रथम मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा(स्थापना व विनियम) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
४. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बधंनकारक राहील व

वेळोवेळी करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर स्वंयअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

६. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE मध्ये माहिती भरतांना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

तसेच शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमल बजावणी करणे बंधणकारक राहील.

तरी, शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प. गोंदिया यांची शिफारस विचारात घेता आरटीई नियमांतील तरतूदी व माध्यमिक शाळा संहिता नियमातील तरतूदीच्या अधिन राहून व उपरोक्त अटी व शर्ती नूसार **लिटिल वुडस इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया, जि. गोंदिया** या शाळेस खात्याची प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(सतिश मेंढे)
**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग नागपूर**

**प्रतिलीपी**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ, नागपूर यांना माहितीकरीता समादराने अग्रेषित.

२) शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य) जिल्हा परिषद, गोंदिया यांना माहिती तथा पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

३) मुख्याध्यापक **लिटिल वुडस इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया, जि. गोंदिया,** यांना माहितीकरीता अग्रेषित.

# स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील शाळा परवानगीबाबत

जा. क्र.प्राथ/ब/स्वअर्थ/ ६२८८ /२०१३
कार्यालय, शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर
**दिनांक -** 13 SEP 2013

**प्रति,**

अध्यक्ष / सचिव,
गोंदिया होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटी,
गोंदिया, जि.गोंदिया.

**विषय :-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-**१) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ २०१३/(८५/१३)/माशि-१/मंत्रालय, मुंबई- ३२, दिनांक १५ जून, २०१३.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **गोंदिया** | **गोंदिया होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटी, गोंदिया, जि.गोंदिया.** | **लिटील वूड्स इंटरनॅशनल स्कूल गोंदिया,** | **इंग्रजी** | **नवीन शाळा (प्राथमिक)** | **इयत्ता १ ते ५** | **जून-२०१३ पासून** |

## अटी व शर्ती

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल.

४) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पत्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारावर स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग असे लिहीणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पूर्तता करून व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरीता माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ०३ परिशिष्ट ०२ मधील विहीत नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

१०) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना यू-डायस मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग, नागपूर** करिता

**प्रतिलिपी-**

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. शिक्षण संचालक (प्राथ.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, गोंदिया यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित. सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे याची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.

# स्वयं अर्थसहाय्यीत तत्त्वावरील शाळा परवानगीबाबत

जा. क्र.प्राथ/ब/स्वअर्थ/ ६३८२ /२०१३
कार्यालय, शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर
दिनांक - 13 SEP 2013

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
गोंदिया होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटी,
गोंदिया, जि.गोंदिया.

**विषय :-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-**१) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ २०१३/(८५/१३)/माशि-१/मंत्रालय, मुंबई- ३२, दिनांक १५ जून, २०१३.

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **गोंदिया** | **गोंदिया होमिओपॅथिक एज्युकेशन सोसायटी, गोंदिया, जि.गोंदिया.** | **लिटील वूड्स इंटरनॅशनल स्कूल गोंदिया,** | **इंग्रजी** | **नवीन शाळा (प्राथमिक)** | **इयत्ता ६ ते ८** | **जून-२०१३** |

## अटी व शर्ती

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४

५) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे, त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

६) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

७) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

८) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पत्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारावर स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग असे लिहीणे बंधनकारक राहील.

९) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१०) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पूर्तता करून व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरीता माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ०३ परिशिष्ट ०२ मधील विहीत नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

११) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना यू-डायस मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

सत्य प्रत शिक्षण उपसंचालक यांनी अनुमोदित केली आहे.

शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर करिता

**प्रतिलिपी-**

शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, गोंदिया यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे याची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.

मा. अवर सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२